# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट १६-२३** **दिनांक १५/०१/२०२३**

## वेश्या व्यवसाय करणाऱ्या ०२ पुरुष आरोपीतांना अटक करुन ०२ पिडित महिलांची सुटका- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांची कामगिरी.

दि.१३.०१.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, इसम नामे तुळशी साव रा. दहिसर,मुंबई, पुर्व हा मिरा-भाईंदर परिसरात वेश्या व्यवसाय करीत असुन त्याच्या मोबाईल क्रमांकावर पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला की, तो व्हॉटसअॅपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना मुलींचे फोटो पाठवुन त्यांच्याशी व्हॉटस्अॅपकॉलव्दारे संपर्क करुन मिरा-भाईंदर परिसरातील लॉजमध्ये गिऱ्हाईकास रुम बुक करावयास लावुन गिऱ्हाईकाचे सोयीनुसार १०,०००/- रु वेश्यागमनाचा मोबदला घेवुन गिऱ्हाईकास वेश्यागमनासाठी मुली पुरवितो.

प्राप्त माहितीच्या अनुषंगाने पो.नि. समीर अहिरराव, नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर व पोलीस पथकाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन वेश्यादलाल तुळशी रामेश्वर साव याने बोगस गिऱ्हाईकास सुचविल्याप्रमाणे त्याचे अॅटो रिक्षातुन साई रिजन्सी (काजल) लॉजिंग अॅण्ड बोर्डिंगसमोरील उड्डाणपुजाजवळ, मुंबई-अहमदाबाद महामार्ग, कामिशिमिरा, मिरारोड पुर्व येथे आला असता पंचाच्या समक्ष बोगस गिऱ्हाईकास ०२ मुली दाखवुन त्याबदल्यात एका मुलीचा वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन ठरलेली रक्कम स्वीकारल्याने त्यास १६.४५ वा. सापाळा कारवाई करुन ताब्यात घेतले व केलेल्या चौकशीत एका पिडीत महिलेचा पती प्रकाशकुमार घोष हा तिस पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी पाठवित असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला देखील ताब्यात घेवुन सापळयातील रोख रक्कम व इतर मुद्देमाल जप्त करुन ०२ पिडित महिलेंची सुटका करण्यात आली. सदरबाबत उमेश हरी पाटील, सपोउपनि. यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन वर नमुद आरोपीतांविरुध्द काशिमिरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि.नं. I २७/२०२३, भा.दं.वि.सं.कलम ३७०,३४ सह अ.व्या.प्रति.अधि. १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप. आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री. समीर अहिरराव, स.पो.उप.नि. उमेश पाटील, पो.अंम. केशव शिंदे, चा.पो.हवा. गावडे, महिला म.सु.ब. अपर्णा गायकवाड नेम- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,भाईंदर यांनी केली आहे.

-----oooo-----